**प्रेसनोट** **दि.०४/०६/२०१९**

## कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे शहर

## वेश्या व्यवसायातून पर राज्यातील मुलीची सुटका

दि.०३/०६/२०१९ रोजी कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.मदन बहाद्दरपुरे यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, मॉटी पाटील नावाचा एजंट हा कोरेगाव पार्क, पुणे येथील १० ब्लॉस्सम सर्व्हिस अपार्टमेंट मध्ये मुली ठेवून वेश्या गमनसाठी रक्कम ठरवून ग्राहकांना मुली सदर ठिकाणी वेश्या गमनासाठी पाठवितो व तो वेश्या गमनाकरिता आलेल्या ग्राहकाकडून ४ ते ५ हजार रू. नमूद मुली मार्फत वेश्या गमनाचे पैसे स्वीकारतो. त्यातून स्वतःसाठी ठराविक हिस्सा काढून घेवून त्यावर स्वतःची उपजीविका भागवितो, अशी बातमी मिळाल्याने, पोलीस स्टेशन कडील अधिकारी व स्टाफ व पंचासह लिबर्टी सोसायटी, फेज नं.१, सी-७, नॉर्थ मेन रोड, कोरेगाव पार्क, पुणे येथे जावून छापा घातला असता छाप्यामध्ये परराज्यातील पीडित मुलगी मिळून आली. सदर मुलीकडून एजंट नामे मॉटी पाटील हा वेश्या व्यवसाय करवून घेत असल्याचे व सदर मुलगी ही पर राज्यातील असून, ती गरीब घरातील असल्याचे समजल्याने व तिचे गरीबीचा फायदा घेवून, तिस पैशाचे आमिष दाखवून तिचे करवी वेश्या व्यवसाय करून घेत असताना मिळून आल्याने वर नमूद एजंट मॉटी पाटील याचेविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे व नमूद पीडित मुलींची वेश्या व्यवसायातून सुटका करण्यात आलेली आहे व नमूद पीडित मुलीस रेस्क्यु फाऊंडेशन, हडपसर, पुणे येथे संरक्षणकामी ठेवण्यात आलेले आहे.

सदरची कारवाई ही मा.श्री.बच्चन सिंग सो., पोलीस उप आयुक्त, परि.२, पुणे शहर, यांचे मार्गदर्शनाखाली श्री.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पो.स्टे. पुणे, पोलीस निरीक्षक, (गुन्हे) श्री. माने, महिला पोलीस उप निरीक्षक श्रीमती कल्याणी शिंदे व पोलीस कर्मचारी दिनेश शिंदे, हर्षदा शिंदे, सावंत यांनी कारवाई केलेली आहे.

(मदन बहाद्दरपुरे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे